दिनांक : ३ मार्च २०१०

## पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा
## शिष्यवृत्ती दरात व संचात वाढ

मुंबई, दि. ३ : दर दहा हजार लोकसंख्येस तीन या प्रमाणात शिष्यवृत्ती संच मंजूर करण्याचा निर्णय आज मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

पूर्व माध्यमिक (इयत्ता ५वी ते ७वी) शिष्यवृत्तीचे दर प्रतिमहा प्रति विद्यार्थी ७५ रुपयांवरून १०० रुपये आणि माध्यमिक (इयत्ता ८वी ते १०वी) शिष्यवृत्तीचे दर प्रतिमहा प्रति विद्यार्थी १०० रुपयांवरुन १५० रुपये एकूण दहा महिन्यांसाठी इतकी वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली. पात्र विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीचे वितरण बँकेमार्फत करण्यास मंजुरी देण्यात आली.

---o---